अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय (वि)
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ.(वि.)/६/४७६६
दिनांक : १६/१/१९

**बैठकीचे इतिवृत्त**

मा.महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष शहर फेरीवाला समिती पुणे मनपा यांचे अध्यक्षतेखाली शहर फेरीवाला समिती सदस्यांची बैठक दि.५/१/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालील अधिकारी /सदस्य उपस्थित होते.

१) मा. अति.महापालिका आयुक्त(वि) पुणे महानगरपालिका
२) मा. उप आयुक्त अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका
३) मा. पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर
४) मा. उप अभियंता/शाखा अभियंता, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका
५) विभागीय अतिक्रमण अधिकारी, क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका
६) मा. शहर फेरीवाला समिती – उपस्थित सदस्य

सर्वप्रथम दि. १४.०८.२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या वृत्तांतावर चर्चा होवून वृत्तांत कायम करण्यात आला.
सदर बैठकीमध्ये विषयपत्रांमधील विषयांवर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा | घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|
| १ | मागील दि. १४/८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कामाचा आढावा घेणे | मागील दि. १४/८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांवर मुद्देसुद माहिती देण्यात आलेली आहे. | मागील दि. १४/८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| २ | स्वारगेट येथील महामेट्रो प्रकल्पाच्या कामामध्ये अडथळा ठरणाऱ्या अधिकृत/नोंदणीकृत पथविक्रेत्यांचे सिंहगड रोड, पु.ल.देशपांडे उद्यानासमोरील फुटपाथवर तात्पुरते पुर्नवसन करणेबाबत मागील बैठकीत घेतलेल्या निर्णयाबाबत पुनर्विचार करुन संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडून सुचविलेल्या नवीन ठिकाणांचा पुनर्वसनाकामी चर्चा करुन | महा मेट्रो प्रकल्पाकरिता स्वारगेट पीएमपीएमएल बस स्थानकाजवळील पथ/स्टॉल विक्रेत्यांचे पुनर्वसन सिंहगड रोड येथील पर्वत्ती जलकेंद्र ते पु.ल.देशपांडे उद्यान येथील रस्त्याच्याकडेला करण्याचे ठरविण्यात आलेबाबत उप आयुक्त अतिक्रमण यांनी माहिती दिली. तथापि अशा प्रकारे सरसकट सर्व पथ विक्रेत्यांचे सिंहगड रोडवर पुनर्वसन करण्यास पथारी व्यवसायिक प्रतिनिधींनी विरोध दर्शविला त्याबाबत मा.उप आयुक्त अतिक्रमण यांनी काही व्यवसायिक त्यांच्या निवासी जागेच्या ठिकाणी जाण्यास तयार असल्यास त्यांचे त्या भागत उपलब्ध जागेनुसार | मुख्य रस्ते/नो–हॉकर्स रस्ते या ठिकाणावर सध्या अतिक्रमण कारवाई करण्यात येत आहे. याबाबत नागरिकांच्या/सभासदांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच वाहतुकीस अडथळा होत नसेल असा वाहतुक पोलीसांचा अभिप्राय असेल आणि १/३ फुटपाथ पथारी व्यवसायधारक वापरत असेल तर त्या ठिकाणी |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | निर्णय घेणे. | पुनर्वसन करणे शक्य होईल असे सांगितले. श्री.शंके यांनी स्वारगेट येथील व्यवसायिकांनी पुनर्वसन जागेसह लेखी मागणी देऊनही त्यांचे पुनर्वसन केलेले नाही. मेट्रोला पथारी व्यवसायिकांची काहीही अडचण नसताना हटविण्यात आले आहे. मेट्रो ने जागा मागितलेली नाही, तरी मेट्रोच्या नावाखाली फेरीवाल्यांना का हटविता, असा प्रश्न श्री. शंके ह्यांनी विचारला. रस्ता/पदपथांवरील चालणाऱ्या माणसांना फुटपाथवरुन चालता आले पाहिजे, परंतु व्यवसायधारक हे पुर्णपणे फुटपाथवर सामान ठेवतात, त्यामुळे माणसांना रस्ता/पदपथांवरुन चालावे लागते, त्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ होत आहे, असे पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा यांनी सांगितले. १/३ फुटपाथ हा पथारी व्यवसायिकांसाठी देण्यात यावा, परंतू ज्या ठिकाणी १/३ पेक्षा जास्त फुटपाथ वापरत असेल त्या ठिकाणी कारवाई करण्यात यावी, याबाबत सगळ्या संघटनेनी सहमती दर्शविली. पुर्नवसन झालेनंतरच कारवाई करण्यात यावी व रस्तेनिहाय त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे, तसेच त्यांना प्राथमिक सुविधा करण्यात यावी, त्यांनतरच त्यांचेवर कारवाई करण्यात यावी, असे बाळासाहेब मोरे यांनी सांगितले. ज्या-ज्या ठिकाणी पुनर्वसन केलेले आहे, त्याच ठिकाणी कारवाई होत आहे, असे संघटनांनी आक्षेप घेतले. एन.जी.ओ. प्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या वेळेनंतर पथारी व्यवसायिक हे रस्त्यावर अतिक्रमण करुन व्यवसाय करतात, त्यामुळे वाहतुकीस अडथळा होत आहे. तरी त्यांचेवर कारवाई करणेत यावी असे सांगितले. | व्यवसाय करणेस प्रशासनाची काही हरकत नाही परंतु दिलेल्या जागेपेक्षा जास्त जागा वापरण्यात येत असतील त्यांचेवर कारवाई करण्यात येईल, असे मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांनी आदेश दिले.<br>मा.अध्यक्ष तथा अति. महा.आयुक्त(वि) यांनी स्वारगेट येथील व्यवसायिकांचे पुनर्वसनाप्रकरणी पुन्हा नव्याने महामेट्रो कार्यालयाकडून स्वारगेट परिसरात फेरीवाल्यांचा कितपत अडथळा आहे अथवा त्यांना स्थलांतरित करणेबाबत माहिती घेतली जाईल. तद्नंतर या समितीने निर्माण करण्यात येणाऱ्या उपसमितीमार्फत प्राथमिक निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी असे आदेश दिले. |
| ३ | बाणेर, स.नं. १५३/८ येथील मनपा ओटा मार्केट आरक्षित जागेवर आवश्यक त्या प्राथमिक सुविधा तयार करुन तेथील औंध-बाणेर डी.पी. रोड व डॉ. आंबेडकर चौक परिसरातील नोंदणीकृत/अधिकृत फेरीवाल्यांचे उपलब्ध | संबंधित क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समितीने या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तेथील परिसरातील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणेकरीता सदर जागेवर प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रस्तावानुसार कार्यवाही करणेस हरकत नसल्याचे समिती सदस्यांनी चर्चेत मान्य केले. | या ठरावास सर्व समिती सदस्यांनी बहुमताने मान्यता दिल्याने मा. समिती अध्यक्षांनी त्यानुसार प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेस प्रशासनास आदेश दिले. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | गाळ्यांनुसार पुनर्वसन करणेस मान्यता मिळणे. (संबंधित मा. प्रभाग समितीची मान्यता झालेली आहे) | | |
| ४ | दिव्यांग/अंध या विशेष श्रेणीमधील व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षणाचा कालावधी ठरविणे, त्यांची पात्रता निश्चित करणे, त्यांची व्यवसाय जागा ते राहत असलेल्या प्रभागामधील मान्य हॉकर्स झोनमध्येच पुनर्वसन करणे, त्यांचे व्यवसाय साधने व करावयाचे व्यवसाय, परवाने भाड्याने देणे इ.बाबत वारंवार अटी/शर्तीचा भंग करणे, एका झोनमधील एकूण व्यवसायिकांचे अनुषंगाने त्यांची धोरणानुसार संख्या निश्चित करणे इ.बाबत सर्वकष चर्चा करुन अथवा स्वतंत्र समिती नेमून धोरण निश्चित करणेबाबत निर्णय घेणे. | दिव्यांग/अंध या विशेष श्रेणीमधील व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षणाबाबत बरेचसे अर्ज आजही कार्यालयाकडे प्राप्त होतात. दि. ३०/११/२०१७ ही अंतिम मुदत होती, तरी पण अर्ज आजअखेर या कार्यालयाकडे येतात. यापूर्वी आलेल्या अर्जाचा निर्णय प्रशासनास घेता येईल परंतू इथूनपुढे आपल्याला नवीन अर्ज घेता येणार नाही. परंतू कायमस्वरुपी अर्ज घेणेबाबत दिव्यांग संघटनेने मागणी केली, ३% जागा दिव्यांगास देणार आहोत. अपंगांचे सर्व स्टॉल भाड्याने देत आहेत, असे श्री. शंके यांनी सांगितले. तसेच कायद्याच्या तरतूदीप्रमाणे पुर्तता करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. एकूण ९२० दिव्यांगास प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत. परंतू हे सर्व दिव्यांग मोठे-मोठे स्टॉल लावतात व वाद निर्माण करतात. महत्वाचे व रहदारीचे रस्त्याच्या ठिकाणी व्यवसाय थाटतात त्यांचेबाबत तक्रारी आल्यास कारवाईस विरोध करुन चुकीच्या पध्दतीने आंदोलने केली जातात. त्यामुळे याकामी विशेष श्रेणीधारक व्यवसायिकांचेबाबत सर्वकष धोरण निश्चित करणे आवश्यक असल्याने हा प्रस्ताव प्रशासनापुढे ठेवण्यात आल्याचे सर्व समिती सदस्यांना माहिती देताना मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी सांगितले. | पुन्हा नव्याने जेव्हा बायोमेट्रीक सर्व्हेक्षण करण्यात येईल तेव्हा नव्याने आलेल्या दिव्यांग/अंध यांचे अर्जाचा विचार करण्यात येईल. सध्या मुदतीत आलेल्या अर्जांचा विचार करावा. तसेच विशेष श्रेणी बहाल केलेल्या उदा. दिव्यांग/चर्मकार या व्यवसायिकांचेबाबत प्रशासनाने योग्य तो धोरणाचा प्रस्ताव तयार करुन या समितीने नव्याने नेमलेल्या उप कमिटीमध्ये मान्य करुन पुढील बैठकीमध्ये मान्यतेकरीता ठेवावा, असे मा. अध्यक्ष यांनी आदेश दिले. |
| ५ | पुणे शहरातील अधिकृत/नोंदणीकृत फेरीवाले यांचेकडून वारंवार ठरवून दिलेल्या अटी/शर्तीचा भंग होत राहिल्याने त्यांचेवर महाराष्ट्र शासन फेरीवाला अधिनियम-२०१७ या योजनेमधील कलम ५.३ ते ५.५ अन्वये करावयाच्या कार्यवाहीचा मा. शहर फेरीवाला समितीस असलेला अधिकार, मनपा | महाराष्ट्र शासनाच्या योजनेची प्रशासनाने मा. उच्च न्यायालयाने दि. रोजी दिलेल्या निकालानुसार कश्याप्रकारे अंमलबजावणी करावी, याबाबत मार्गदर्शनपर विचारणा केली आहे, अशी उपआयुक्त (अतिक्रमण) यांनी सर्व समिती सदस्यांना माहिती दिली. | हा विषय पुढील बैठकीत घेणेबाबत मा. अध्यक्ष यांनी निर्णय दिला. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रशासनातील सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडील मा. महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व मा. सह महापालिका आयुक्त/मा. उप आयुक्त परिमंडळ क्र. १ते ५ व मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांना कार्यालयीन कामाचे सोयीकरीता प्रदान करणेस. त्यामुळे रहदारीस होणारे अडथळे स्थानिक नागरिकांच्या तक्रारी, परवाना शुल्काची वसुली, पुनर्वसन करणे इ.बाबत प्रशासनाकडील उपलब्ध असलेल्या कमी मनुष्यबळामध्ये प्रकरणांचा मुदतीमध्ये निपटारा करणे प्रशासनास शक्य होईल. याविषयी चर्चा विनिमय करुन निर्णय घेणे. | | |
| ६ | पुणे पेठ सदाशिव, निलायम सिनेमा जवळील उडडाणपूला खालील जागेत यापूर्वी मनपा मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून बांधलेल्या मिनी मार्केट मधील २८ गाळ्यांचे हॉकर्स पुनर्वसनाकरीता अतिक्रमण विभागाकडे हस्तांतरण झाल्याने ते गाळे त्या परिसरातील पात्र नोंदणीकृत व्यवसायिकांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन उपलब्ध करुन देणेस. | ज्या व्यवसायिकांकडून सदर ठिकाणच्या गाळ्यांची मागणी करण्यात येईल, अशा व्यवसायिकांना तेथील गाळे देण्यास हरकत नाही, असे संघटनाचे प्रतिनिधींनी मागणी केली. त्यावर मा. उप आयुक्त यांनी गाळे वाटपाबाबत प्रचलित धोरणाची माहिती दिली. | या विषयाप्रकरणी अतिक्रमण विभागकडील प्रचलित मान्य धोरणानुसार सदर ठिकाणच्या गाळ्यांचे वाटप करणेबाबत आदेश दिले. |
| ७ | शहरातील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसन, हॉकर्स, झोन्स, फूड झोन्स व तदनुषंगिक इतर विविध प्रस्तावांना वेळोवेळी मा. शहर फेरीवाला समितीची मान्यता घेणे आवश्यक असून समितीची | या विषयातील धोरणात्मक बाबींवर सर्वकष चर्चा करुन निर्णय होणेकरीता सदस्यांनी उप समितीस नेमण्याच्या प्रशासनाच्या या प्रस्तावास मान्यता देऊन सदर उपसमितीवर प्रत्येक प्रवर्गामधील १ व प्रवर्ग २ मधील फेरीवाल्यांचे २ सदस्य याप्रमाणे खालील सदस्यांच्या शिफारशी केल्या. | कामाबाबत कक्षा निश्चित करुन उपसमिती स्थापन करणेस व त्यामधील सदस्यांच्या निवडीस मा. अध्यक्ष यांनी मान्यता दिली. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | बैठक ३ महिन्यानंतर होत असते. त्यामुळे मधल्या कालावधीत अशा प्रस्तावांवर चर्चा विनिमय करुन मा. शहर फेरीवाला समितीची मान्यता घेणेकरीता शिफारस करणेकामी शहर फेरीवाला समितीमधील ५ सदस्यांची (प्रत्येक प्रवर्गातील १ सदस्य व मा. उप आयुक्त , वाहतूक पोलिस विभाग, पुणे शहर याप्रमाणे) उप कमिटी नेमणेस | १) मा. उप आयुक्त (अतिक्रमण)-उप समिती अध्यक्ष<br>२) मा. उप आयुक्त, वाहतूक पोलिस - सदस्य<br>३) श्री. आशुतोष जाधव- सदस्य<br>४) श्री. बाळासाहेब मोरे- सदस्य<br>५) श्री. दादा अल्हाट - सदस्य (दिव्यांग प्रतिनिधी)<br>६)श्रीमती शालिनी कुकडवाल - सदस्य<br>७) श्री. विनय पै.(एन.जी.ओ.) - सदस्य | |
| | आयत्यावेळेचे विषय | | |
| १) | मा. उप आयुक्त, वाहतूक पोलीस, पुणे शहर यांनी पुणे शहरातील राबविण्यात येणाऱ्या फेरीवाला धोरणांबाबत केलेली विचारणा. | मा. उप आयुक्त, वाहतूक पोलीस, पुणे शहर यांनी या बैठकीस नव्याने प्रथमतः आल्याने सद्यस्थितीत पुण्यातील फेरीवाल्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या फेरीवाला धोरणांबाबतची थोडक्यात माहिती देणेबाबत मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांना विनंती केली. त्या अनुषंगाने मा. उप आयुक्त (अतिक्रमण)यांनी सदर धोरण अमंलबजावणीबाबतची सद्यस्थितीची थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर मा. उप आयुक्त, वाहतूक पोलीस, यांनी बैठकीतील अगोदर झालेल्या विविध चर्चांच्या अवलोकनानुसार १) बैठकीच्या चर्चेत वैयक्तिक विषयांऐवजी धोरणात्मक बाबींवर चर्चा करणे, निर्णय घेणे व त्यामध्ये सुसूत्रता आणणे. २) या बैठकीमध्ये नकारात्मक भूमिकेऐवजी सर्वांनी सकारात्मक राहून विषयांवर चर्चा करणे आवश्यक. ३) फेरीवाल्यांना विश्वासात घेऊन त्यांचे पुनर्वसन पट्टे आखून योग्य ठिकाणी कमीत कमी जागा वापराची साधने देऊन केल्यास ते सहकार्य करतात. वाहतुकींच्या रस्त्यावर ज्या ठिकाणी मूळ रस्ता-रुंदी व्यतिरिक्त जास्त रस्तारुंदी असलेल्या ज्या ठिकाणांवर पादचाऱ्यांना अडथळा होणार नाही, अशा ठिकाणी पुनर्वसन करणे शक्य होऊ शकते. ४) याकरीता प्रथम पॉलिसी (कार्यपध्दती) ठरविणे आवश्यक आहे. याप्रमाणे त्यांनी निरीक्षण नोंदविले. | या अनुषंगाने प्रायोगिक तत्वावर वर्दळीच्या रस्त्यावर उदा. शिवाजी रस्ता मा. उप आयुक्त वाहतूक पोलीस यांनी सुचविलेल्या पध्दतीने त्यांचे सहकार्याने प्रायोगिक तत्वावर व्यवसायिकांचे पुनर्वसन करुन पाहणेस मा. उप आयुक्त (अतिक्रमण)यांना मा. समिती अध्यक्ष यांनी सूचविले. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २) | अतिक्रमण निरीक्षक/सहा. अतिक्रमण निरीक्षक यांचे बदल्या इतर विभागात करणेबाबत. | कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये अतिक्रमण विभागाकडील सर्व कर्मचाऱ्यांची इतर विभागात बदली करण्यात आली. त्याच धर्तीवर अतिक्रमण निरीक्षक यांची इतर विभागात बदली करण्यात यावी, जेणेकरुन कारवाया ह्या प्रभावी व सक्षम होतील, असे जाणीव संघटनेचे शंके यांनी मागणी केलेली आहे. | याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. |

वरील प्रमाणे चर्चा व निर्णय होऊन शहर फेरीवाला समितीची बैठक संपन्न झाली.

16.12.19

(राजेंद्र निंबाळकर)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

प्रतः- सर्व संबंधित कार्यालयास योग्य त्या कार्यवाहीकरिता-

Scanned by CamScanner